क्रमांक : ११००९ /ई-१ कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई-४०००३२
दिनांक : १५ जुलै, २०२१

**:: परिपत्रक ::**

**विषय : महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२१ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनातील व्यपगत करण्यात आलेले प्रश्न अतारांकित स्वीकृत करण्यात आल्याबाबत**

**संदर्भ : (१) या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक ८७०१/ई-१, दिनांक ०८ जून,२०२१**
**(२) या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक ९७९२/ई-१, दिनांक २८ जून, २०२१**

सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात येते की, विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची मंगळवार, दिनांक २२ जून, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत सन २०२१ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनात प्रश्नोत्तरे घेण्यात येणार नसल्याचे तसेच स्वीकृत प्रश्न व्यपगत करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यानुषंगाने या अधिवेशनासाठी विभागाकडे उत्तरासाठी पाठविण्यात आलेले तारांकित स्वीकृत प्रश्न व वस्तुस्थितीसाठी विभागाकडे पाठविण्यात आलेले प्रश्न व्यपगत करण्यात आले असल्याचे संदर्भ क्रमांक २ वरील परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते.

तथापि, सोमवार, दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी विधानपरिषद सभागृहात व्यपगत प्रश्न अतारांकित स्वीकृत करण्याबाबत उपस्थित केलेल्या मुद्द्याच्या अनुषंगाने मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार या अधिवेशनाकरिता उत्तरासाठी विभागाकडे पाठविण्यात आलेले तारांकित स्वीकृत प्रश्न अतारांकित स्वीकृत करण्यात आले आहेत. या अतारांकित प्रश्नांची उत्तरे म.वि.प. नियम ७०(२) अन्वये सदरहू परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत या सचिवालयास पाठविण्यात यावीत. तसेच, वस्तुस्थिती/वस्तुस्थिती व सदस्य खुलाशाचे विभागाकडे पाठविण्यात आलेले प्रश्न विधानपरिषद नियमातील तरतुदींच्या अनुषंगाने व्यपगत करण्यात आले आहेत.

**( राजेश तारवी )**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति :

१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
२) मा.उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३) मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित